PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 7, ISSUE 4

# अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट चळवळीचे शेतकरी विषयक कार्य (इ.स.१९६२ ते १९९०)

**धरम शितल अरविंद**
संशोधक विद्यार्थी -
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट चळवळीने शेतकरी वर्गाचे प्रश्न सोडवण्यासाठी महत्त्वपूर्ण असे योगदान दिले. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकार, सावकार, जमीनदार या घटकांना विरोध केला. तर स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सरकारच्या दडपशाहीच्या धोरणास विरोध करून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कम्युनिस्ट चळवळीने उल्लेखनीय स्वरूपाची भूमिका बजावल्याचे दिसून येते.इ.स १९६२ च्या चीन, भारत युद्धानंतर कम्युनिस्ट पक्षात वैचारिक मतभेद होऊन फुट पडली. प्रामुख्याने इ.स १९६२ नंतर कम्युनिस्ट चळवळीस देश पातळीवरूनच उतरती कळा लागल्याचे दिसते. त्याचे पडसाद हे महाराष्ट्र राज्य व अहमदनगर जिल्ह्यातही उमटल्याचे दिसून येते. या काळात चळवळीचे स्वरूप मंदावण्यास सुरुवात झाली असली तरी शेतकरी व कामगार वर्गाचे प्रश्न सोडवण्यासाठी कम्युनिस्ट चळवळीने कार्य केलेले दिसते. कॉ. वसंतराव तुळपुळे, कॉ. विश्वनाथ पाटील कर्डिले, कॉ. आचपळराव लांडे, कॉ. सातपुते मामा, कॉ. कमलाबाई भागवत, कॉ. राजाराम पाटील, कॉ. लांडे पाटील, कॉ. शशिकांत

कुलकर्णी, अण्णासाहेब शिंदे, कॉ. माधवराव गायकवाड. कृष्णा पवार, कॉ. बाळासाहेब नागवडे, कॉ. बी. के. देशमुख, कॉ. रामभाऊ नागरे, कॉ. बाबुराव थोरात, भास्करराव गलांडे, या कम्युनिस्ट चळवळीतील कार्यकर्त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**उद्दिष्टे**

१) अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी चळवळीचा इ.स. १९६२ ते १९९० या कालावधीतील कम्युनिस्टांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

२) कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या ज्या समस्यांसाठी लढा दिला त्यांचा अभ्यास करणे.

३) ज्या भागात चळवळीचा प्रसार झाला त्या घटनांचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

१) इ.स. १९६२ नंतर कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लढा दिला.

२) भूमीहीनांना जमिनी मिळवून देण्यासाठी कम्युनिस्ट चळवळीने महत्त्वपूर्ण योगदान दिले.

३) खंडकरी शेतकरी चळवळीसाठी कम्युनिस्ट चळवळीने कार्य केले.

**अहमदनगर जिल्ह्यातील धरणग्रस्त विस्थापितांचे पुनर्वसन**

गोदावरी नदीवर पैठण येथे बांधण्यात आलेल्या धरणामुळे धरण क्षेत्रातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला होता. यावेळी अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा धरणाच्या बांधकामामुळे विकास तर होणारच होता मात्र अनेक शेतकऱ्यांचे पुनर्वसनामुळे जीवनमान विस्कळीत होणार होते. धरण बांधण्याचा निर्णय हा कसा अयोग्य आहे यामुळे शेतकऱ्यांना काय समस्यांना तोंड

द्यावे लागेल हे कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी धरण बांधण्याची घोषणा करताच शेतकरी वर्गाच्या लक्षात आणून देण्यासाठी त्यांचे प्रबोधन केले. ७ डिसेंबर १९६० रोजी माननीय मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी पैठण धरणाच्या निर्मितीसाठी स.गो.बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे आयोजन करून नद्यांची नियोजन, पाणीपुरवठ्याच्या सुविधांचा वापर, नवीन प्रकल्प आराखडे, आर्थिक बाबी आदी विषयावर माहिती मिळवून त्यांचा सखोल अभ्यास करून ही माहिती ९, जून १९६२ पर्यंत अहवाल स्वरूपात सादर करावी.[१] यावेळी समितीने जलसंपत्तीचा अपुरासाठा असा अहवाल दिला. धरण प्रकल्पामुळे सिंचन, उद्योग, व्यवसाय व घरगुती वापरासाठी पाण्याचा उपयोग होईल असा अहवाल देण्यात आला.[२] परंतु या धरण प्रकल्पामुळे शेवगाव, नेवासा, पैठण, गंगापूर या तालुक्याच्या परिसरातील एकूण ६५ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली जाणार होत्या. त्यात अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव व नेवासा या परिसरातील अनुक्रमे २० ते २५ गावे धरण क्षेत्रात जाणार होती. यावेळी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कम्युनिस्ट चळवळीतील कॉ. नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आगार नांदूर येथे सभेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कॉ. पी.बी. कडू पाटील यांनी धरण विषयक ठराव या सभेत मांडला. यावेळी सरकारने दोन महिन्याच्या आत पर्यायी योजनेचा अवलंब करावा असे सुचवून शेतकऱ्यांच्या काही मागण्या यावेळी करण्यात आल्या.[३] तसेच २६ व २७ जून रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आलेली परिषद, २९, जुलै १९६५ रोजी मुंबई विधानसभेवर नेण्यात आलेला मोर्चा, १८, मार्च १९६६ रोजी धरण बांधकामास प्रतिबंध घालण्यासाठी करण्यात आलेला सत्याग्रह यामध्ये कम्युनिस्ट चळवळीतील कार्यकर्त्यांनी धरणग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी वेळोवेळी मोर्चे, आंदोलने, परिषदा, सत्याग्रह यांच्या माध्यमातून धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारचा पाठपुरावा केला गेल्याचे दिसते.

**इ.स. १९६२ ते १९९० अहमदनगर जिल्ह्यात कम्युनिस्टंनी भूमीहीनांसाठी केलेले कार्य-**

अहमदनगर जिल्ह्यामध्ये एका बाजूस मोठे बागायतदार, जमीनदार यांच्याकडे हजारो एकर जमिनी होत्या तर दुसऱ्या बाजूस भूमिहीन,गरीब व हलाखीचे जीवन जगत असलेला वर्गही होता. खेड्यांमध्ये जवळपास ४०% जनता ही भूमिहीन होती. ज्या शेतकऱ्यांकडे काही जमीन होती ती देखील तुटपुंजी स्वरूपाची होती. त्यामुळे बड्या बागायतदारांकडील जमीन भूमी हीनांना मिळाव्यात यासाठी कम्युनिस्ट चळवळीतील कार्यकर्त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.[४] ८, फेब्रुवारी १९७० रोजी श्रीरामपूर या ठिकाणी लाल निशान पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष व सी.पी.एम.यांच्या अधिपत्याखाली भूमिहीन व आदिवासींची परिषद कॉ. दत्ता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. परिषदेमध्ये बड्या बागायतदारांचे जमिनीवर असलेले वर्चस्व नष्ट करून ती आदिवासी व भूमीहिनांमध्ये वाटप करण्यात यावी तसेच आदिवासींकडील गायरान म्हणून असलेली जमीन सरकारने काढून घेऊ नये.भूमीहिनांनी 'जबरन जोत' या मार्गाने जमीन हस्तगत करावी असे ठरले. लालबावट्याच्या अधिपत्याखाली यावेळी २३ हजार एकर जमीन हस्तगत केली. त्यावेळी जिल्ह्यात अनेक केंद्राच्या माध्यमातून सत्याग्रहाचा अवलंब कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी केला. यामध्ये कॉ. पी.बी. कडू पाटील, कॉ. बी. के. देशमुख, कॉ. रामभाऊ नागरे, कॉ. बाबुराव थोरातयांनी भूमी हिनांसाठी दिलेला हा राज्यव्यापी स्वरूपाचा लढा होता.[५] ४, मे १९७० रोजी कॉ. बि.के. देशमुख यांनी आपल्या भाषणात शेतकरी व जमीनदार यांच्यातील जमीन कसण्याच्या प्रत्यक्ष तपावतीवर भाष्य केले.[६] ८ ते १३,मे १९७० यादरम्यान दिल्ली येथे झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीत सिलिंगच्या कायद्यात सुधारणा करून भूमिहीनांसाठी जमिनी हस्तगत करण्याच्या मागण्या करण्यात आल्या. तसेच सरकारी जमिनी, पडीक जमिनी, जंगल क्षेत्रे असलेल्या जमिनी सोडून सर्व जमिनीचे भूमिहीनांमध्ये वाटप करावे. कुळ कायद्यात दुरुस्ती करावी. कारखान्यांचे मालकीचे फार्म, फळबागा, देवस्थान, गायरान यांना मिळणाऱ्या सरकारी सवलती रद्द करण्यात याव्यात. यासारख्या मागण्या करण्यात आल्या. बैठकीत संमत झालेल्या ठरावानुसार ७ जून नंतर सर्व भूमिहीनांना कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी 'पेरते व्हा'

असा संदेश देऊन जमिनी जबरदस्तीने हस्तगत करण्याच्या लढ्यास सुरुवात करण्यात आली.[७]

१, जुलै १९७० रोजी राहुरी तालुक्यात भा.क.प., अखिल भारतीय किसान पक्ष, आदिवासी, भूमिहीन, शेतमजूर संघ यांच्या वतीने जमीन पेरणी सत्याग्रहाचे आयोजन कॉ. बाबुराव थोरात, कॉ. गंगाधर जाधव यासारख्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी केले.[८] श्रीरामपूर परिसरात सरकारने १४४ कलम जारी केले असतानाही सत्याग्रहींनी आपला लढा सुरूच ठेवला.यावेळी ८०० सत्याग्रही औरंगाबाद व बीड भागातील सहभागी झाले. याचे नेतृत्व कॉ. चंद्रगुप्त चौधरी व कॉ. नितीन उगले यांनी केले.तसेच कॉ. बाळासाहेब नागवडे, कॉ. वकीलराव लंघे, कॉ. नामदेवराव आव्हाड, कॉ. जगन्नाथ सोनवणे, कॉ. बाबुराव थोरात, कॉ.आचपळराव लांडे, कॉ. विनायकराव औटी यासारख्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या अधिपत्याखाली या सत्याग्रहात शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.[९] बड्या जमीनदारांकडून जमिनी हस्तगत करण्याच्या लढ्याची लोन संपूर्ण देशभर पसरले.६११९०९ एकर जमीन क्षेत्र हस्तगत केले.तर यावेळी ३११८३ सत्याग्रहींना अटक करण्यात आली.या लढ्यात कॉ. एकनाथराव भागवत यांची भूमिका महत्त्वाची आहे.[१०] कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा सरकारला विरोध सुरू असतानाच १९७५ मध्ये देशात आणीबाणी घोषित होताच पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० कलमी घोषणापत्र जारी करून ज्या शेतकऱ्यांना जास्तीच्या जमिनी आहे त्यांनी त्या जमिनी भूमीहीनांना द्याव्यात असे धोरण अवलंबले.[११]

**अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट चळवळीचे खंडकरी शेतकऱ्यांसाठी चे कार्य १९६२ ते १९९०**

ब्रिटिश काळापासूनच कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी अल्प दराने शेतकऱ्यांकडून ऊस पिकवण्यासाठी घेतल्या होत्या. या उसाचा वापर कारखान्यांमध्ये कच्चामाल म्हणून केला जात होता. यावेळी खूपच कमी दराने शेतकऱ्यांना या जमिनीची वार्षिक खंडणी मिळत होती. कारखानदारांना मात्र कारखान्यातून मिळणाऱ्या

नफा हा जास्तीचा होता.[१२] दुष्काळी लहरी हवामान पाणीपट्टी कर्जबाजारीपणा या कारणांमुळे शेतकऱ्यांना या जमिनी कसणे शक्य होत नसे. त्यामुळे त्यांनी आपल्या जमिनी ठराविक खंड घेऊन कारखानदारांना दिल्या होत्या. कारखानदारांनी या शेतीमध्ये यांत्रिक पद्धतीचा वापर करून उसाची लागवड केली. व स्वतःच कारखान्यांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची गरज ती पूर्ण करू लागले.[१३] खंडकरी शेतकरी चळवळीस सुरुवात इ.स. १९५१ मध्ये भास्करराव गलांडे यांनी केली. 'आमच्या बापाच्या जमिनी आम्हास परत करा' असे म्हणत चळवळीस त्यांनी सुरुवात केली. खंडकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी कम्युनिस्ट चळवळीतील अण्णासाहेब शिंदे यांनी शेतकऱ्यांना आपल्या प्रश्नांना न्यायालयात दाद मागण्यासाठी सांगितले. शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी सनदशीर मार्गाने सोडवावे असे सांगितले. तसेच नेवासा, शेवगाव परिसरातील खंडवाड संबंधीचा वाद स्वतः विना मोबदला लढावला.याबरोबरच या चळवळीत भास्करराव पाटील गलांडे, ज्ञानदेव थोरात, धोंडू पाटील औताडे, नानासाहेब वाघ, लक्ष्मणराव पालवे, किसनराव आसणे यासारख्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. श्रीरामपूर हा भाग बागायती असल्याने उसाचे पीक आधी घेतले जात होते त्यामुळे या भागात ही चळवळ अधिक वाढीस लागली.

## संदर्भ ग्रंथ सूची

1) साप्ताहिक 'युगांतर', महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. २५, जुलै १९६५ पृष्ठ क्र. ३

2) राजदेव त्रिंबक, 'महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये कॉ. दत्ता देशमुख यांचे कार्य',( शोध प्रबंध), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, २००२, पृष्ठ क्र. २१३,२१४

3) साप्ताहिक 'युगांतर', महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १४, मार्च १९६५ पृष्ठ क्र. ४

4) भागवत एकनाथ,'जमिनीचा लढा लढवा' भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, राजभुवन, सरदार पटेल रोड, मुंबई, प्रथम आवृत्ती, १०, जुलै १९७० पृष्ठ क्र. ३

5) कित्ता पृष्ठ क्र. ३

6) शेवाळे विठ्ठल,'एका वादळाची कहाणी', कॉ. बी. के. देशमुख यांचे जीवन कार्य',प्रकाशक कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लॅग बिल्डिंग, बिंदू चौक, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती, मे, २०१० पृष्ठ क्र. २४,२५

7) साप्ताहिक 'युगांतर', महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १७, मे १९७० पृष्ठ क्र. ८

8) साप्ताहिक 'युगांतर', महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १७, जुलै १९७० पृष्ठ क्र. ६

9) भागवत एकनाथ,'भूमी मुक्ती आंदोलन आणि प्रमुख पक्षाच्या भूमिका', भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, राजभुवन, सरदार पटेल रोड, मुंबई पोस्ट क्र. ७ ते ९

10) साप्ताहिक 'युगांतर', महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. २३,ऑगस्ट १९७० पृष्ठ क्र. ३

11) कडू पी.बी. 'क्रांती पंढरीचा वारकरी', (शब्दांकन - सविता भावे) प्रकाशक अरुण पुंजाजी कडू, सात्रळ, राहुरी. सप्टेंबर २०१४ पृष्ठ क्र. ६५

12) दैनिक समाचार, वर्ष २९ वे, अंक ११७ वा, दि. ६,ऑगस्ट १९५५ पृष्ठ क्र. ४

13) शिंदे रावसाहेब ध्यासपर्व ( rebel for a cause),अमेय प्रकाशन,पुणे,चौथी आवृत्ती, २००९.पृष्ठ क्र.२२८